# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०९/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन कुहीची कार्यवाही

दिनांक २४/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, मौजा कुही फाटा येथे टिप्पर द्वारे रेतीची चोरी केली जात आहे. अशा माहिती वरून मौजा कुही फाटा येथे नाकाबंदी केली असता १२ चक्का रेती भरलेला टिप्पर क्र एम एच ४०/सी एस ९८९१ दिसला ट्रक चालकाला नाव विचारले असता त्याने आपले नाव रविंद्र भिमराव धनवीजय वय ३५ वर्ष रा.नांद पोस्ट वेलतुर ता. भिवापुर जि. नागपुर असे सांगितले त्याला रेती परवाना (रॉयल्टी) विचारले असता  रेती परवाना नाही असे सागितले.  टिप्पर मधे अंदाजे १० ब्रास रेती भरलेली दिसली १२ चक्का रेती भरलेला टिप्पर क्र एमएच ४०सी एस ९८९१  कि. ४०,००,०००/—रु.ज्यामधे बिना परवाणा १० ब्रस रेती प्रती ब्रस ६,०००/—रु. प्रमाने एकुन ६०,०००/—रु. असा एकुन ४०,६०,०००/—रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. ०१) याला मालकाचे नाव विचारले असता त्याने मालक नामे गणेश जुनघरे रा. उमरेड जि. नागपुर असे सांगितले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे—पोहवा गजेंद्र हरीभाउ चौधरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे दोन्ही टिप्पर चालक आणि मालक या आरोपीतांविरुध्द कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सहिंता सह.कलम ४८(७) (८) महा. जमिन महसुल कायदा १९६६ सह.कलम ४, २१ सार्वजनीक संपत्तीचे नुकसान खाण आनि खनिज अधि १९५७ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कुही येथील ठाणेदार पोनि भानुदास पिदुरकर आणि पोलीस स्टाफ यांनी पार पाडली.

## धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, पोस्टे सावनेर अंतर्गत हेटी (नंदाजी) येथे दि. २३/०९/२४ चे २१/४६ वा. २२/२५ वा. दरम्यान महेश भुरचंद्र राउत, वय ३६ वर्ष रा. हेटी (नंदाजी) ता. सावनेर ना.ग्रा हा तलवार घेवून फिरत आहे. अशी माहिती मिळाल्याने पोउपनि बी जी राठोर, सोबत पोलीस कर्मचारी सह गावात पोहचलो व आरेपी जवळीत तलवार जप्त केली नमुद आरोपी विरुध्द सरतर्फे पोउपनि बी जी राठोर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा, सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहा. पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर